# <u>महिला व बाल विकास विभाग</u>

# <u>राज्य् शासन योजना</u>

## 1) समुदाय आधारीत कार्यक्रम (CBE) :-

**उददेश :** गरोदर माता, महिला, बालके, किशोरवयीन मुली या लाभार्थीमध्ये आरोग्य्, पोषण, शिक्षण, स्वच्छता विषयक जनजागृती करणे

**स्वरुप :** CBE कार्यक्रमां अंतर्गत अंगणवाडी सेविकांमार्फत गरोदर माता ओटीभरण, 6 महिने पूर्ण बालकांना अर्धवार्षिक वाढदिवस साजरा करणे, सुपोषण दिवस , हात-धुणे कार्यक्रम व ३ वर्षे पूर्ण झालेल्या बालकांचा अंगणवाडीमध्ये प्रवेशउत्स्व कार्यक्रम घेतले जातात.

## 2)आरंभ प्रशिक्षण :-

**उददेश :** 0 ते 3 वर्षे वयोगटातील बालकांचा सर्वांगीण विकास होणेकरीता त्यांच्या पालकांना प्रोत्साहन व प्रशिक्षण देणे.

**स्वरुप :** पालकांना आरंभ प्रशिक्षणाव्दारे बालकांची काळजी,पूर्व उददीपन उदयन (Early stimulation) याबाबत सक्षमीकरण, बालकांचा बौध्दीक व पंचज्ञानेंद्रिय विकासासाठी प्रशिक्षित करण्यात येते. याकरीता गृहभेटी, पालकसभा, पालक मेळावा या माध्यमाने पालकांना संदेश देण्यात येवुन त्यांची क्षमताबांधणी अंगणवाडी सेविका यांचे मार्फत करण्यात येते.

## 3) आकार प्रशिक्षण :-

**उददेश :** 3 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांचा बौध्दिक व शारीरीक विकास घडवून आणणे.

**स्वरुप :** अंगणवाडी मध्ये येणा-या 3 ते 6 वयोगटातील सर्व बालकांना कृतीयुक्त् अनौपचारीक पूर्व प्राथमिक शिक्षण दिले जाते. शारीरीक, मानसीक, बौध्दीक, भाषिक सुक्ष्म् विकासातले टप्पे इ. बाबत विविध कृतिव्दारे बालकांना शिक्षण दिले जाते.

# ४) पोषण अभियान :-

उददेश :

1) 0 ते 6 वयोगटातील बालकांमधील बुटकेपणा कमी करणे
2) 6 ते 59 महिने वयोगटातील मलांमधील ॲनिमिया प्रमाण कमी करणे.
3) 15 ते 49 वयोगटातील महिला व किशोरवयीन मुलींमधील ॲनिमिया प्रमाण कमी करणे
4) जन्मत: कमी वजन असलेल्या बालकांचे प्रमाण कमी करणे.

स्वरुप : सर्व एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय व अंगणवाडी स्तरावर सन 2018 पासुन " पोषण अभियान " कार्यक्रमाची अंमजबजावणी केली जाते. दरवर्षी सप्टेंबर महिना ' पोषण महिना 'म्हणून राबविण्यात येतो. यामध्ये अंगणवाडी सेविकांमार्फत गावपातळीवर पोषण विषयक विविध विभागांच्या समन्वयानेकरण्यात येते.

# ५) पोषण ट्रॅकर :-

उददेश : ICDS विभागामार्फत दिल्या जाणा-या सर्व सेवांची ऑनलाईन नोंद घेणे.

स्वरुप : पोषण ट्रॅकर ॲपच्या माध्यमातून अंगणवाऊी सेविका लाभार्थी आधार कार्ड व्हेरीफीकेशन, बालकांची वजन-उंची भरणे, बालकांना व मातांना दिले जाणारा THR/HCM नोंदी, लसीकरण, CBE कार्यक्रम, अंगणवाडी उघडणे बाबत स्थिती इ. सर्व माहिती नियमितपणे ऑनलाईन भरतात.

# 6) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC)

उददेश : अतितीव्र कुपोषित (SAM)बालकांना कुपोषणातून बाहेर काढणेसाठी अंगणवाडी केंद्रावर ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात येतात.

स्वरुप : अतितीव्र कुपोषित बालकांना (SAM) EDNF फुड दिले जाते त्याप्रमाणे अतिरिक्त् आहार देण्यात येतो.

# 7) लेक लाडकी योजना

उददेश : मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्म्दर वाढवणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलींचा मृत्युदर कमी करणे व बालविविह रोखणे, शाळाबाहय् प्रमाण 0 (शुन्य्) वर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे, कुपोष्ंण कमी करणे.

स्वरुप : दि.1 एप्रिल 2022 रोजी व त्यानंतर जन्माला येणा-या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील. मुलीचा जन्म् झाल्यावर रु.5,000/-, मुलगी पहिलीत गेल्यावर रु.6,000/-, मुलगी सहावीत गेल्यावर रु. 7,000/-, मुलगी अकरावीत गेल्यावर रु.8,000/-, मुलीला अहरा वर्ष पूर्ण झाल्यावर रु.75,000/-, एकूण लाभ रु. 1,01,000/- पहिल्या अपत्यास तिस-या हप्त्यासाठी व दुस-या अपत्याच्या दुस-या हप्त्यासाठी अर्ज सादर करते वेळी माता/पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहीत.
आवश्यक कागदपत्रे:- लाभार्थी जन्माचा दाखला,पालकाचे आधारकार्ड,लाभार्थीचे आधारकार्ड, कुटुंबप्रमुखांचा उत्पनाचा दाखला, संयुक्त बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पानांची छायाकिंत प्रत, रेशनकार्ड इ.

# 8) बेटी बचाओ बेटी पढाओ

उददेश : मुलींचा जन्म्दर वाढविणे, गर्भलिंग निदान करणेस प्रतिबंध करणे, शिक्षणास प्रोत्साहन व सुरक्षिततेबाबत जनजागृती करणे.

स्वरुप : जिल्हा, तालुका व अंगणवाडी पातळीवर केंद्र प्रकल्प् पुरस्कृत “ बेटी बचाओ बेटी पढाओ ” कार्यक्रमाची अंमजबजावणी करण्यात येते. गर्भवती मातांची नोंदणी मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, आरोग्य् शिबीर आयोजन, पथनाटय, गुड्डा गुड्डी बोर्ड, विविध स्पर्धा घेतल्या जातात.